**वादपत्र नि.क्र.०१**         **१**    नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५०/२०१८
दिलीप उमाजी बडे + ४ वि. दत्तात्रय बडे + ५

**<u>वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>**
(पारीत केल्याची तारीख **१२.१२.२०१८**)

**०१.** वादी क्रमांक ०१ हजर. वादींतर्फे विधीज्ञ श्री. एस. एन. सानप गैरहजर. प्रतिवादी क्रमांक ०४ व तर्फे विधीज्ञ श्री. एस्. ए. हाफिज गैरहजर.

**०२.** प्रतिवादी क्रमांक ०४ हा दिनांक **११.०९.२०१८** रोजी विधीज्ञ श्री. एस. ए. हाफीज यांच्यामार्फत हजर झाला आहे. प्रतिवादी क्रमांक ०४ ने मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल केली नाही किंवा मुदत अर्ज दाखल केला नाही.

**०३.** प्रतिवादीने **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१</u>** नुसार मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल केली नाही. म्हणून प्रतिवादी क्रमांक ०४ विरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार अर्ज **<u>नि.क्र.०५</u>** आणि दावा **''विना म्हणणे व विना कैफियत''** चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०४ याने मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल केली नाही म्हणून त्याच्याविरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा अर्ज **<u>नि.क्र.</u>**०५ आणि दावा **''विना म्हणणे व विना कैफियत''** चालवण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड**

**स्थळ : रोहा**
**दिनांक : १२.१२.२०१८**